# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.02.2025** **वारःबुधवार**

---

1. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात AI चा संपूर्ण मानवतेला फायदा होईल या दृष्टिनं जागतिक सहकार्याची गरज-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. कृषी, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र, गुंतवणूक आणि निर्यातीसह देशातल्या ग्रामीण भागात समृद्धी आणण्याला सरकारचं प्राधान्य-अर्थमंत्री निर्मला सीतारामन
3. महाकुंभ सोहळ्यात आज माघ पौर्णिमा स्नानानिमित्त भाविकांची गर्दी आणि
4. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये 33 सुवर्ण पदकांसह महाराष्ट्राचा संघ पदकतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर

**<u>पंतप्रधान मोदी-फ्रान्स दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात AI च्या परिवर्तनात्मक प्रभावावर प्रकाश टाकत AI ही या शतकात मानवतेसाठी संहिता लिहिणारी एक परिभाषित शक्ती आहे असं मत व्यक्त केलं. ते काल पॅरिसमध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासमवेत AI कृती शिखर परिषदेचे सह-अध्यक्ष पद भूषवताना बोलत होते. AI चा संपूर्ण मानवतेला फायदा होईल या दृष्टिनं जागतिक सहकार्याच्या गरजेवर मोदी यांनी भर दिला. सार्वजनिक हितासाठी AI विकसित करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेची पुष्टी करत लाखो लोकांचं जीवन सुधारण्याची AI ची क्षमता असल्याचंही पंतप्रधान मोदी यांनी अधोरेखित केलं.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी मार्सेली इथं पोहोचले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात या ठिकाणाचं मोठं महत्त्व आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर इथल्याच समुद्रकिनाऱ्याजवळ जहाजातून उडी मारुन मार्सेली बंदरावर पोहोचले होते. त्यावेळी त्यांना पाठिंबा देणाऱ्या आणि ब्रिटीशांच्या ताब्यात देण्याला विरोध करणाऱ्या फ्रेंच कार्यकर्त्यांचे आणि जनतेचे मला आभार मानायचे आहेत असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>जयशंकर-फ्रान्स</u>**

भारत आणि फ्रान्समधील द्विपक्षीय संबंध परिपक्व होत असताना व्यवसायाची भूमिकाही वाढत आहे, असं मत परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी व्यक्त केलं. ते काल 14 व्या भारत-फ्रान्स मुख्य कार्याध्यक्षांच्या मंचाचं उद्घाटन करताना बोलत होते. भारत आणि फ्रान्स ही स्वतंत्र विचारसरणीची परंपरा असलेली राष्ट्रे असून दोन्ही देशातील सहकार्यामुळे मेक इन इंडिया धोरणालाही लाभ होईल असं डॉ. एस. जयशंकर यांनी यावेळी सांगितलं.

**<u>अर्थमंत्री</u>**

कृषी क्षेत्र, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र, गुंतवणूक आणि निर्यातीसह देशातल्या ग्रामीण भागात समृद्धी आणण्यावर सरकार भर देत आहे, असं मत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केलं. त्या काल लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना बोलत होत्या. केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये देशातील सर्वाधिक मागासलेल्या 100 जिल्ह्यांमध्ये कृषी उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात आला आहे असं सांगत यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा राष्ट्रीय विकासाच्या गरजा आर्थिक प्राधान्यांसह संतुलित करणारा आहे असं निर्मला सीतारामन म्हणाल्या.

तत्पूर्वी चर्चेत भाग घेत समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी कल्याणकारी योजनांचा लाभ सामान्य लोकांपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप केला. तर काँग्रेसचे सालंग संगमा यांनीही केंद्रीय अर्थसंकल्पावर टीका करत कृषी, शिक्षण आणि

शहरी विकास या क्षेत्रांसह देशातल्या प्रमुख समस्या सोडवण्यात अर्थसंकल्प अपयशी ठरला आहे. तसंच शिवसेनेचे श्रीकांत शिंदे यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात समाजातील प्रत्येक घटकाचं हित जपलं असल्याचं अधोरेखित केलं.अर्थमंत्र्यांच्या उत्तरानंतर लोकसभेचं कामकाज उद्या म्हणजे 13 फेब्रुवारीपर्यन्त तहकूब करण्यात आलं.

**<u>राज्यसभा</u>**

दरम्यान राज्यसभेत काल केंद्रीय अर्थसंकल्पावर पुन्हा चर्चा सुरू झाली. चर्चेत भाग घेताना भाजपचे भागवत कराड म्हणाले की, सरकारनं केलेल्या सक्रिय उपाययोजनांमुळे वित्तीय तूट कमी झाली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रफुल्ल पटेल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली येत्या काही वर्षांत देश जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास व्यक्त केला. तसंच भाजपचे अरुण सिंह यांनी हा अर्थसंकल्प गरिबांसाठी अनुकूल असून शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यास आणि तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास मदत करणारा असल्याचं सांगितलं. तर दुसरीकडे, शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही महत्त्वाच्या क्षेत्रांकडे सरकारनं पुरेसे लक्ष दिलेलं नाही, असा आरोप अपक्ष खासदार कपिल सिब्बल यांनी केला. इतर अनेक सदस्यांनीही अर्थसंकल्पावर भाष्य केलं.

**<u>राष्ट्रपती</u>**

शिक्षण, संशोधन, आरोग्य सेवा आणि युनानी पद्धतीच्या औषधांचं उत्पादन या बाबतीत भारत जगात आघाडीवर आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या काल नवी दिल्लीत युनानी दिनानिमित्त दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन करताना बोलत होत्या. ग्रीस आणि मध्य आशियातील देशांपेक्षा अधिक प्रमाणात युनानी औषध पद्धती भारतात वापरली जाते, असं सांगत युनानी पद्धतीशी संबंधित संशोधक आणि अभ्यासक आधुनिक पद्धती आणि तंत्रज्ञानाचा वापर करत असल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाधान व्यक्त केलं. तर युनानी औषध आणि इतर भारतीय औषध पद्धतींचा विकास करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे, असं मत यावेळी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केलं

**<u>गृहमंत्री</u>**

सीमा सुरक्षा दलानं घुसखोरीला आळा घालण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून सीमा सुरक्षा अधिक सक्षम करावी असे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले आहेत. ते काल नवी दिल्लीत जम्मू आणि काश्मीरमधील सुरक्षा आढावा घेण्यासाठी आयोजित उच्चस्तरीय बैठकीत बोलत होते.

**<u>महाकुंभ</u>**

प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभामध्ये आज माघ पौर्णिमा स्नान सुरू आहे. या वर्षी 10 लाखांहून अधिक कल्पवासी भाविक यामध्ये सहभागी होत आहेत. उत्तर प्रदेश सरकारनं विशेष वाहतूक व्यवस्थेसह कडक सुरक्षा व्यवस्था तयार केली आहे. जगातला सर्वात मोठा धार्मिक मेळावा म्हणून ओळखला जाणारा महाकुंभ 13 जानेवारीपासून सुरू झाला. आतापर्यंत 46 कोटींहून अधिक भाविकांनी संगमात पवित्र स्नान केलं आहे.

**<u>करसंकलन</u>**

देशाच्या प्रत्यक्ष कर संकलनात गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत 14 पूर्णांक 69 शतांश टक्क्यांची वाढ झाल्याची माहिती केंद्रिय प्रत्यक्ष कर मंडळानं दिली आहे. चालू आर्थिक वर्षात 17 लाख 78 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रत्यक्ष कर संकलित झाला आहे. वैयक्तिक प्राप्तीकर संकलनातही 9 लाख 47 हजार कोटी रुपयांची वाढ झाली असून 7 लाख 78 हजार कोटी रुपये भांडवली कर जमा झाला आहे.

**<u>वैष्णव सेमीकंडक्टर</u>**

लॅम रिसर्च ही कंपनी भारतात 10 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणार असल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. भारताच्या सेमीकंडक्टर निर्मिती प्रवासातला हा आणखी एक महत्त्वाचा प्रकल्प असल्याचं वैष्णव यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. देशाच्या सेमीकंडक्टर अभियानाचा एक

भाग म्हणून या उद्योगात गुंतवणुकीला प्रोत्साहन दिलं जात आहे. भारताला सेमीकंडक्टर डिझाईन क्षेत्राचं जागतिक केंद्र बनवणं हा या अभियानाचा उद्देश आहे. लॅम रिसर्च ही अमेरिकन कंपनी सेमी कंडक्टर निर्मिती क्षेत्रात जगात पहिल्या क्रमांकावर आहे.

**सायकल- मांडविया**

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी देशातील आघाडीच्या सायकल उत्पादकांना सर्व वयोगटातील सायकलिंगला प्रोत्साहन देण्याचं आवाहन केलं. आघाडीच्या सायकल उत्पादकांसोबत काल झालेल्या बैठकीदरम्यान, डॉ. मांडवीय यांनी भर दिलं की अशा प्रकारच्या प्रोत्साहनांमुळे लोकांना सायकलिंगकडं प्रवृत्त करता येईल,तसंच सायकलिंगमुळे देशातील कार्बन उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतं. याशिवाय फिट इंडिया उपक्रमांतर्गत 'संडे ऑन सायकल' उपक्रमाला पाठिंबा देण्याची वचनबद्धता त्यांनी व्यक्त केली.

**नेतान्याहू**

गाझा पट्ट्यातल्या ओलीस ठेवलेल्या इस्राइली नागरिकांची येत्या शनिवारपर्यंत सुटका केली नाही तर हमास बरोबरची युद्धबंदी संपवण्यात येईल असं सांगून त्यानंतर इस्राइल हल्ल्यांची तीव्रता आणखी वाढवेल असा इशारा इस्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी दिला आहे. या निर्णयाला इस्राइलच्या मंत्रीमंडळानंही मान्यता दिल्याचं नेतान्याहू यांनी काल एका ध्वनीचित्रफितीद्वारे सांगितलं. येत्या शनिवारी ओलिसांची सुटका करण्याचं पुढं ढकलल्याची घोषणा हमासनं केल्यानंतर नेतान्याहू यांनी हा संदेश दिला आहे.

**स्नूकर**

मध्य प्रदेशातील यशवंत क्लब इथं आयोजित भारतीय स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेत 36 वं राष्ट्रीय विजेतेपद आणि 10 व्या पुरुष स्नूकर मुकुटाचा मानकरी पदाचा मान स्नूकर खेळाडू पंकज अडवाणीनं पटकावला आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड दरम्यान मर्यादित षटकांचा तिसरा आणि अंतिम क्रिकेट सामना आज अहमदाबादमधल्या नरेंद्र मोदी मैदानावर खेळला जाणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल. तीन सामन्यांच्या या मालिकेत भारतानं 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. आजच्या सामन्यात विजयासह मालिका जिंकण्याचं भारतीय संघाचं लक्ष्य असेल.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

उत्तराखंड मध्ये सुरू असलेल्या 38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्रानं एकंदर 149 पदके जिंकत सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं आहे. महाराष्ट्राने या स्पर्धेत 33 सुवर्ण, 48 रौप्य आणि 48 कास्य पदकं पटकावली आहेत. सैन्य क्रीडा दलाचा संघ 55 सुवर्णपदकं मिळवून पदकतालिकेत प्रथम क्रमांकावर आहे तर महाराष्ट्राचा संघ दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**याबरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं बातमीपत्र संपलं.**
**नमस्कार.**